१८७२

# विनोदिनी

वसंत

REFBK-0005772
REFBK-0005772

ठाणे मराठी ग्रंथसंग्रहालयास
सप्रेम भेट

# विनोदिनी

## वसंत

यांच्या निवडक विनोदी कवितांचा संग्रह

REFBK-0005772
REFBK-0005772

मूल्य ५ आणे

चैत्र शुद्ध प्रतिपदा शके १८६०, ठाणें.

'वसंत'

यांचा पुढील कवितासंग्रह

# द र व ळ

सर्व हक्क लेखकाच्या स्वाधीन

प्रकाशक : वसंत रामकृष्ण वैद्य,
भागवतांचा बंगला, ठाणें.

मुद्रक : विष्णु गणेश शेंबेकर,
सद्भक्ति-प्रकाश प्रेस, कोट, मुंबई.

आईची वत्सलता व वडिलांची

विवेकशीलता जिच्यामध्यें

सामावली आहे

त्या माझ्या

प्रिय

**सौ. ताईस**

'वसंत'

यांचा सोळा कथांचा संग्रह

# चन्द्रकला

छापत आहे.

स० ग १०३८

# अनुक्रम


| नांव | | | पृष्ठ |
|---|---|---|---|
| सेन्सॉर | ... | ... | २ |
| कवि आणि संपादक | ... | ... | ४ |
| तारका | ... | ... | ६ |
| अपवाद | ... | ... | ८ |
| सारें घडे त्यामुळें | ... | ... | ९ |
| सारें घडे त्यामुळें | ... | ... | १० |
| सारें घडे त्यामुळें | ... | ... | ११ |
| ओढणी | ... | ... | १२ |
| अग ए | ... | ... | १३ |
| जा सगळें विसरून | ... | ... | १५ |
| सप्तपदी | ... | ... | १६ |
| क्वीनट | ... | ... | १८ |
| विरोधाभास | ... | ... | १९ |
| आजची गौळण | ... | ... | २० |
| सजवितों म्हणाशिल तैशापरी | ... | ... | २१ |

'बहरा'चें रसिकांकडून योग्य स्वागत झाल्यामुळेंच त्यांत आश्वासिल्याप्रमाणें दोन वर्षांपूर्वींच तयार असलेला हा विनोदी कवितांचा संग्रह आज मी त्यांच्या स्वाधीन करीत आहें. यांतील बहुतेक कविता स्वतंत्र आहेत परंतु विडंबनाच्या वादळाचे वारे वाहत असतांना झालेली कांहीं रूजहि येथें पाहावयास मिळेल. या कवितांचें कार्य केवळ करमणुक हें आहे. साहित्यिक नसलेल्या माझ्या प्रेमळ रसिकांची सोय व्हावी म्हणून या संग्रहित केल्या आहेत.

रसिकांचा ऋणी,

वसंत रामकृष्ण वैद्य

भागवतांचा बंगला, ठाणें.
चैत्र शु॥ १ शके १८६०

६८
१५३८

# विनोदिनी

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
५५८२

वसंत

# सेन्सॉर

कवी उठला सोडून झोंप गोड
हातिं घेउन बैसला वही जाड,
काव्य खर्डियलें तीस, स, ला, ना, तें,
रसिक नव्हता परि जवळ ऐकण्यातें.

होति अर्धांगी परि न चारुगात्रा,
कवी नैराश्यें कंठितसे यात्रा.
काव्यसंपत्ती एकला विसांवा
राजहंसीस्तव हंस झुरत जावा !

जान कुर्बानी कराया न कोण
तटीं तळमळतो जलाविण मीन !
कुण्या काल्पित आदर्श कामदेला
कवी आणुन चालवी लेखणीला.

काव्यचित्रांचा तीच विषय झाली
तिच्यावांचुन ना एक ओळ आली.
काव्य झालें उत्कृष्ट हर्ष झाला,
गात नाचत कवि हपीसांत गेला.

पत्नि पाही तें बाड उघडलेलें,
गीत वाची नुक्तेंच लिहीलेलें–
कुण्या सवतीला दिल्रुबा जिवाचा
कवी अर्पितसे हार सारसांचा.

जणों नागिण दुखवली जातिवंता !
वाहि काखोली शिव्यांची स्वनाथा.

फिरे शेळीच्या सुरी कंठनाळीं
वही निमिषार्धीं कव्हरमात्र झाली.

काव्यमोदें उन्मत्त कवी झाला
आणि सायंतनिं गृहाप्रती आला.
वृत्त कळलें तों हदरला मनांत
खचे कंबर, भूवरी झेंप घेत.

" नव्हे भार्या, गतजन्मवैरिणी ही
क्षुधित वाघिण स्वप्रजा खात जाई !"
" काय भकतां? हं जीभ आवरा ही
कोण असली वंचना मनीं साही ?–

धर्मपत्नी ही नांदते सजीव
कुण्या सटवीवर ठेवितसा जीव ?
नाहिं असले मी साहणार थेर
मला निर्दाळुन काव्य करा स्वैर.

नका आणूं काव्यांत सुंदरीला
आणि चालूं द्या काव्यनिर्मितीला."
थंड झाला कर लावि कपाळाला,
नयनयुग्मांतुन अश्रुपूर आला.

कवी अंतरला काव्यकन्यकांना !
आणि अंतरला नियतकालिकांना !
त्याच वर्षीं ये खूट पोस्टखातीं.
होत वृत्तांच्या बचत पोस्टखातीं !

७-११-१९३२

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे

# कवि आणि संपादक

तोंडपिठींतिल फुलापरिस तव गौरतनू सुकुमार,
तारुण्यानें खुलवटलेली तूं युवती गुल्जार.

विनयाची अन् सौंदर्याची अव्यतिकीर्णामूर्ति !
भावकोमला स्नेहविलोला अविरत काव्यस्फूर्ति !

रसिक जिवाची ओढ लागली झुरे पंजरीं मैना,
मार्गशीर्ष बघ समीप आला घेउन राजसराणा.

ललितकलेची आवड त्याला असेल कवि जन्माचा
काव्यसेवनीं तत्पर त्याच्या हाच धर्म भार्येचा.

शब्द तयाचे-काव्यफुलें जणुं-झेलुन हृदयावरती
अमर करी तूं आर्यसतीचें नांव मेदिनीवरती.

करिल मस्तकीं काव्यसुमांची उधळण औदार्यानें
सखे, लाडके, प्रिये, स्नेहले संबोधिल वचनानें.

तूं साकी, तो श्लोक,-गझल, तूं ठेकेदार कवाली,
छेलबटाऊ आणि मोहना, तरुवर तो, तूं वेली,

शर्वरीश तो, कैरविणी तूं, कंदिल तो, तूं ज्योती,
धनि आवाजी सुनेय फोनो, तूं केझलची पेटी !

प्यार जिवाचा अर्पुन हृदया करिल तनू कुर्बान,
सुखवृक्षावर पोपट मैना करिल चिरंतन गान.

नसला नशिबीं कवि–रसिकांचा प्यार सोड ना धीर
ममवचनामृत मनीं ठेवूनी सोड दृष्टीचा तीर.

असो खान तो सुलेमान वा अली तरुण जवान,
बदामवाला नवसारीचा पेस्तनजी धनवान.

मद्रासेचा शालिग्रामी अय्या अय्यंगार,
पंजाबांतिल मिशालसिंग हि देवो तुज आधार.

एक सांगतों बोल जयाला असे जिवाचें मोल
अनुभूतीस्तव स्वयें वेचिलें जीवित हें अनमोल.

परि न असावा मासिक-दैनिक संपादक पत्राचा
पत्थर काळा मूर्तिमंत तो काळरसिक चित्ताचा.

अपुल्या इच्छेकरितां आला खविस लागला पाठीं
बाड राहिलें खणांत पडुनी उलटत आली साठी !

काव्यकन्यका खंगत आल्या अखंड कौमार्यानें
ऊर फुटे मम खल हा हांसे अखोर आनंदानें.

प्रथम मुलीच्या जन्मापासुन छळिलें मज अधमांनीं
अश्रूंची ही संतत धारा ओघळते बघ अजुनी !
( धाय मोकली सृष्टिमाउली रडत लेंकरा बघुनी
ओढे, नाले, नद्या, समुद्रहि तुडुंबले अश्रूंनीं. )

तरुणी बोले, "मम पितयाच्या आत्येच्या जाऊचा
भाचा आहे पैसेवाल्या संपादक पत्राचा."
कवी बरळला–"माफी, माफी" देह भूवरी आला
शिफारशीस्तव अंगिकारिलें सत्याग्रह-मार्गाला.
"काव्यसुता मम एक तरी गे उजवो तव वशिल्यानें
जन्मोजन्मीं पूजिन तुजला काव्यसुमनराशीनें."

२२-११-१९३२

मराठी ग्रंथ संग्रहालय

तोंडपिठी-फेस पावडर, धनि आवाजी-हिज मास्टर्स व्हॉइस, सुनेय-पोर्टेबल.

# तारका

आकाशाचा निळा कटोरा हा उपडा झाला,
भाताचीं अवशिष्ट शितें हीं डकलेलीं त्याला !

सुरांगनांनीं नवरात्राचा समारंभ केला,
ओटी भरतां पसा सांडला लाह्यांनीं भरला !

सती रुक्मिणी ताक घुसळितां पाक मंदिरांत
आकाशाच्या भिंतीवरती शितोडे उडत !

रंगाऱ्याचा नवा उघडिला धंदा कीं विधिनें
खडी काढिली नीलपटावर ही कौशल्यानें !

मूल्य न देतां सृष्टीवरला खेळ पाहण्याला
छिद्र केलीं हीं देवांनीं नभिंच्या कणग्याला !

सूर्याचा वरवंटा फिरुनी पाटा हा झिजला,
नित्य नव्यानें टाकी देणें पडते ही त्याला !

उदधिमंथनीं अमूप आलीं रत्नें हाताला
आकाशाची चाळण केली तीं चाळायाला !

रविकिरणांची आंच देउनी तापविली कढई
साखरदाणे घोळ घोळुनी बनवी हलवाई !

देवघरीं वाटते चालली रोजच दिपवाळी
तारका न या पणत्या जळती मिणमिण आभाळीं !

सायंकाळीं जलीं लोटली सूर्याची धोंड
थेंब जलाचे उडुनी भिजलें रजनीचें तोंड !

तारायुत आकाश नव्हे गादीच टांचण्यांची !
छत्रीवरची जुन्या करामत ही तर कसरीची !

पश्चिमेस जी लोहारानें पेटविली भट्टी
भात्याच्या वाऱ्यानें तींतुन ठिणग्या या उडती !

नराकृती सजविण्या पांढरा रंग कालवीला
चुकुन झाडिलें काय विधीनें त्याच कुंचल्याला !

पितृतर्पणीं पिंड सोडिले जलीं मानवांनीं
पितरांस्तव अंगणीं नभाच्या अणिले काढोनी !

केला भृगुनें छातीवरती प्रभुच्या आघात
तेच काजवे डोळ्यापुढती अजुन चमकतात !

जुगार चाले नभःप्रांगणीं देव दानवांत
रुपयांची ही उधळण करण्या रिपूवरी मात !

भूमीवरुनी फुगे उडविले वरति साबणाचे !
तीर लागला नथीस गळले दाणे मोत्याचे !

हारा घेउन धांवत सुटला लंबोदर स्वर्गीं
ठेंच लागतां गडगडले हे मोदक या मार्गीं !

रजनीच्या लावण्या भुलुनी चंद्र खुळा झाला
सखिची झाली स्मृती पातला शयन मंदिराला–

मुख भेदानीं पाहुन कबिला चटक चांदण्यांचा
धन्य वाटलें पुरा उतरला नक्षा चंद्राचा !

३–१२–१९३२

# अपवाद

कशी आहेस ? मजजशी हवी होतीस.

तुडुंब भरला प्रेमवारिधी,
सुखस्वप्नांची झाली गर्दी,
हृदय उकलण्या देउन संधी
गोड हंसलीस–मजजशी हवी होतीस.

लोभलीस मम प्रेमगायनीं,
मीहि रंगलों अमरावाणी,
'अहा' बोललिस मान वेळुनी
बावरलीस–मज जशी हवी होतीस.

मूर्त जाहली काव्यकल्पना
कवितेची मग जरूर कोणा ?
काव्यव्यथेला औषध ललना !
वेणु नागास–मज जशी हवी होतीस.

स्तुति सुमनांची रास घातली,
विनोद सूत्रामधें गुंफिली,
गुलाब लाली–खळी कपोलीं,
' इश्श ' वदलीस–मजजशी हवी होतीस.

विलोल नयनें व्याकुळ झालों,
मधुस्मितानें जगा विसरलों,
अधर सुधेस्तव अधीर झालों,
दूर सरलीस–मजजशी नको होतीस.

५-२-१९३३

# सारें घडे त्यामुळें

आहे खाष्ट जरी स्वभाव तुमचा कां गोड वाटे मला ?
पोरें खंडिभरी गलिच्छ तुमचीं त्यांचा मला कां लळा ?
फोनोनें रमतों अहीपरि जया आवाज पेटी नसे,
यावी शीस असा चहाहि तुमचा मी घट्घटा पीतसे.
हंड्या झुंबर मी म्हणे लटकती जीं त्या घरीं जळमटें,
हांका त्या तुमच्या मना रिझविती 'गंगे, यमे, कारटे'
दावी प्रेम मुलांवरी तुमचिया मी बिस्किटें चारुनी,
ज्ञानी माणुस लाखसें नित तुम्हां संबोधिलें मी जनीं.
शोकी फार असे कुटुंब तुमचें वेण्या दिल्या धाडुनी,
भाज्या आणित मी स्वतास परि त्या येतों तुम्हां देउनी.
आहे ज्येष्ठ मुलास नांव तुमच्या लोकीं 'मवाली' जरी
त्याच्या घालुनिया गळ्यांत कर मी हिंडेन दोस्तापरी.
याला कारण मात्र एक अगदीं नाजूक नान्या कळे
आहे पोर घरीं कुंवार तुमच्या सारें घडे त्यामुळें !

२२-४-१९३३

# सारें घडे त्यामुळें

नाहीं कोणिच पाहिलें कधिं तुम्हां अन्यासवें बोलतां
वाणीची बरसाद कां मजवरी आतांच ही वर्षितां ?
वाणीला मृदुता कधीं न तुमच्या अद्यापिही स्पर्शली
आतां कर्णपथीं सदोदित पडे मंजूळ शब्दावली.
आहे राहत एकटाच तुमच्या चाळींत मी संप्रती
येता सांजसकाळ केवि पुसतां ' आहे कशी प्रकृती ?'
जेवाया करि मी घरीं शिजवितों भाजी, चपाती, पुरी,
हातानें करण्यांत कीं म्हणतसां आहे खरी माधुरी !
भाजी, पापड, लोणचें न चुकतां येतें अतांसें घरीं
सुट्टीच्या दिवशीं तुम्हां घरिं मिळे खाया मला रस–पुरी.
भारी चाळित गातसा अलिकडे माझ्या गुणांची स्तुती,
माया दावितसे कुटुंब तुमचें वाखाणुनी सत्कृती.

याला कारण मात्र एक अगदीं नाजूक नान्या कळे
आहे पोर तुम्हावरीं उपवरा सारें घडे त्यामुळें !

९-६-१९३३

स्थळ प्रत
नं. २१०३ प्र. ११९८
ता. १२-७-३६

# सारें घडे त्यामुळें

नोंदणी ५८८८

नाहीं चैन मना गृहीं पळहि ना रात्रीविना राहतों,
बाजारीं फिरतों, चहा उकळितों, गप्पाष्टकें झोडितों,
झाली रात्र तरी कचेरिंत पडे मी फायली चाळित,
संडेला जमवून मित्र बसतों पत्ते घरीं कूटित.
गादी अंथरली तिनें परि न ती अद्यापि गुंडाळली,
राशी खोलिंत अर्धदग्ध विडिची गुड्घाभरी सांचली,
झोंपा सांजसकाळ घेत परि ना निद्रा गमे संपली,
गाण्याचा नच शोक नित्य तरिही मी ऐकतों मैफली.
लागे लक्ष न जेवणांत निजतों ढोसूनिया सिंगल,
मस्का, स्लेस, कधीं भजी, उसळ वा भाजींत हो चंगळ,
होतो जास्तच पोस्टखर्च, झिजतें भारीच तें फौंटन,
लोकीं मी गमलों डुम्या परि मुका आतां न एक क्षण.
याला कारण मात्र एक अगदीं नाजूक नान्या कळे
माहेरीं पहिलीच खेप सखिची सारें घडे त्यामुळें !

१८-७-१०३३

# ओढणी

ओढुन घे ओढणी, कामदे !

पुरुष जातिचें भूत तुजकडे
पाहतसे निरखुनी.

तीळ गालिंचा लोपुन गेला
कृष्णवर्ण आननीं.

गालावरती तीट दृष्टिची
शुभ्र टेकली कुणी ?

दंत कळयांचा ठेवि फुलौरा
ओष्ठद्वय दडवुनी.

नाकाकरितां नळ तान्साचे
काय बसविले कुणी ?

घनीभूत तम झाला वाटे
कांति तुझी पाहुनी.

डोळा एकच तोहि अन् कुठें
पाहि न ये उमगुनी.

ढगा जवळचा चंद्र चवथिचा
लपविल मुख लाजुनी !

वाव एक ओढून ओढणी
करि जन्माचा ऋणी.

२५-४-१९३३.

# अग एऽऽ!

" कुण्या नांवानं मारूं तुज हांक?
कवीला नांवांचा शोक!

' लाडके, सखये, ' म्हणतां तुज ' प्यार '
वाटतें खुलेल तव नूर.

मालिनी, इंदू, सरस्वती, बिंदू,
शशिकला, सुमन, सुधा, सिंधू,

इंदिरा, विमला, प्रेमा, भानुमती,
शालिनी, शकुंतला, शांती,

कमलिनी, पद्मा, मृणालिनी-बाला,
कुमुदिनी, कुमुद्वती, कमला,

द्रौपदी, कुंती, सावित्री, सीता,
अहिल्या, तारा, शर्मिष्ठा,

मालती, कुंदा, जाई, फुलवेली,
सायली, लतिका, गुळवेली,

कला वा कांता, हंसा, स्नेहलता,
शिखरिणी वा मंदाक्रांता,

कवाली, साकी, उपमा, वक्रोक्ति,
हिरकणी, माणिक, रत्नवती,

रोहिणी, चित्रा, स्वाती, अनुराधा,
रेवती, पूर्वा, भाद्रपदा,

सोहनी, काफी, पूर्वी, मुलतानी,
भैरवी, असावरी, धानी,

नर्मदा, यमुना, कावेरी, गंगा,
मिसिसिपी, मिसुरि, चंद्रभागा,

द्वारका, काशी, मथुरा, पांचाळी,
कराची, उज्जयिनी, दिल्ली,

शिरीन्, मस्तानी, लैला, नूरजहान,
म्हणूं कां तुजला 'मेरीजान?'

एक तव नांव मज वाटे काव्य,
कवीचा काव्यावर जीव!

बोलगे बोल होउन दिल्दार
कोणतें नांव तुला प्यार?"

"जळों तीं नांवें, गमती अपशब्द,
असे मी युवति घरंदाज!

न याचा शोक मजला, मी शंख!
म्हणा मज अग ए बिनूधोक"

सोडि निश्वास, भरलें नैराश्य
कवीची शोक जन्मरास!

४-६-१९३३

# जा सगळें विसरून

प्रेमले, जा सगळें विसरून !

ओळख नसतां छोटूसह तव
पत्र दिलें धाडून.
मंदिरमार्गीं वेण्या दिधल्या
वाट तुझी अडवून.
लक्डि पुलावर तुला हंसविलें
पदर हळुच ओढून.
कर्ज काढुनी मुद्रा आणिली
आलों तुज अर्पून.
प्रेमगीत हें दोहृदयांचें
टाकी गांव भरून.
गीत ऐकिलें तव दादानें
गेला धीर खचून.
दादानें मग संधि साधिली
मारेकरि ठेवून.
पाठ शेकली, पाय ठेचले
गेले दांत पडून.
गातां गातां प्रेमसंगिता
गेलें मुख रंगून.

*　*　*

झिडकारि न मज पुनरपि येतां
प्रसंग हे आठवून !

१७-६-१९३२

# सप्तपदी

[ पुणेरी सत्यकथा ]

सांजचालीचा तरुण खरा शोकी
हाणि नित्याच्या दिशेला दुचाकी.
लोक सारा चालला फिरायाला
दोन बाजूंनीं मार्ग फुलुन गेला.

तोंच अस्मानी पातळांत दूर
दिसे तन्वी पद टाकि डौलदार.
पायचाकीला वेग सहज आला
जसा विद्युत्सहवास मशिनरीला !

तोंच गाडी ये निकट इच्छिताच्या
दंग होती तोऱ्यांत चालण्याच्या.
पायचाकीवर स्वार कुणी झाला
मिळे मार्गीं जर मित्र चाललेला—

हात खांद्यावर ठेवणें तयाच्या
रूढ चाली या आजच्या युगाच्या !
अंगि संचरलें प्रेमस्वप्न भूत
ठेवि खांद्यावर एक तिच्या हात.

अनल हस्ता, भूकम्प मेदिनीला
हात तैसा तो गमे सुंदरीला.
ऊर खालीं वर होय फुगिर नाक
भिडत भुंवया केसांस क्षणार्धांत—

"लाज गेली कां भ्रष्ट मती झाली ?
खीळ माथ्याची काय सैल झाली ?

लाडं मेल्या हें लपव तोंड काळे
जेलमध्यें नेतील हेच चाळे!"

"तुझ्या बाहूंच्या रम्य मृदुल बेड्या
अंगिं पडतां या संपतील खोड्या"
"काढि निर्लज्जा हात मुकाट्यानें"
"मार्ग चालूं दे तुझ्या आश्रयानें.

हात निघतां मी अचुक गे पडेन
तुझ्या अंगावर हेंहि पूर्ण जाण!
सखे! चालूं दे सप्तपदें वाट
तुझ्या संगें मग बसे जन्म गांठ"

गटाराच्या ती तदा ये नजीक
उडी मारुन दे पलीकडे झोंक.
गडी गाडीसह भूमिवरी येत
लोक जमले करण्यास पंकमुक्त.

क्षणीं तीरासम दृष्टिआड झाली
हृदयवीणेची तार तुटुन गेली.
रंग चढला आपादमस्तकाला,
खूण जन्माची राहिली कपाळा.

यदा झाली ती सप्तपदी पूर्ण
प्रणयरोगाला पडे तदा गूण.
स्वप्नसृष्टींतिल मोडले मनोरे,
दृष्टिपुढती नाचती लाख तारे.

जुलै १९३३

# स्त्रीनट

नटवरा, येउं नको परतून !

साळवटी तें जुनेर मळकें
कटीस गुंडाळून.

विरळ वेणिचा टोप निकामी
डोकीवर ठेवून.

घाम दाटतां मुखरंगाची
जाइल खपलि पडून.

स्वयें फेंकिली विडी स्टेजवर
पायानें विझवून.

नको जी. बि. ची कोंबूं तपकिर
नथ बाजूस करून.

गातां गातां विंग रंगवी
पंचम पीक थुकून.

दिसेल लोकां जुनें जानवें
चोळींतुन निसटून.

नको रागवूं नाथावरती
पीळ मिशीस भरून.

घाम लोटतां सोगा उचलुन
कुंकू टाक पुसून.

१०-७-१९३३

# विरोधाभास

[ श्री. काळे ! क्षमस्व ! ]

आज्ञापिल्याविना तूं नाहींच बोलणार,
परवानगीविना ना पाऊल टाकणार,
तूं वाढिल्याविना मी नाहींच जेवणार,
कल पाहुनी मनाचा तैसाच वागणार.

लहरी मनास तुझ्या मी शक्य त्या उपायें
रिझवूं शकेन याचा विश्वास मन्मना ये.

माझ्या तुझ्यांत कोठें वैधर्म्य कांहिं नाहीं,
मज सेव्यभाव प्यारा तव प्रीतिच्याच पायीं.

तूं दागदागिन्याला होसी भुलून चूर
रुचतें तुझ्या मना जें मज तेंच एक प्यार.

सरदार मी न बांका, नाहींस तूं सुरेख,
मी 'खां' न, गायनाचा तुजलाहि नाहिं शोक.

काया न स्थूल माझी, तूं पोर कोमलांगी,
नटणें तुला रुचावें, मम हौस तेथ जागी.

हें सृष्टिसिद्ध जेथें साधर्म्य नांदताहे
प्रासाद तेथ बांधी विधि प्रीतिचे असे हे.

होशील या जिवाची जर तूं अतां धनीण
होईल आपुलें गे आयुष्य सौख्यपूर्ण !

कोडें परी सुटे ना कांहीं न होत बोध
राजी न बोलण्या तूं हा भास कीं विरोध ?

२६-७-३३

# आजची गौळण

कृष्णा! मजकडे पाहुं नको रे
जाईल प्रेम उडून.

केलें न अजुनी स्वच्छ हें वदन
व्हीनोलिया फासून.

फिरला न कोंब केसावरुन
कुठलें ब्रिलियन्टाईन?

नाहीं झांकीले केसानें कान
सरला स्नो अफगाण.

नागीण काळी पाठीची वेणी
पाठीवर रुळल्यावीण-

जाई, चमेली नाहीं वेणींत
जाशील कैसा भुलून?

परीट घडीचें नाहीं पातळ
पदराचें गेलें न भान.

नाहीं बांधीली गार्टर जोडी
येतील घोटे दिसून.

कळवील्यावीण संकेत स्थान
भेटूं नको येऊन.

१४-८-३२

# 'सजवितों म्हणशिल तैशापरी'

"असंख्य असतां अलंकार हे नैसर्गिक तनुवरी
मागणें सरत तुझें ना परी.

हा वक्रोक्ती बघ भुंवयावरती रुळे
शोभते नासिका स्वभावोक्तिच्या मुळें
नेत्रांत सदोदित छेकापन्हुति खुले
आभरणांची धातूंच्या या पुढति न मातब्बरी
मागणें सरत तुझें ना परी."

"असोत तीं लखलाभ तुम्हांला काव्यांतिल भूषणें
न माझें थांबणार तुणतुणें.

काव्यांत हजारों असतांना सुंदरी
कां पत्करली ना एक त्यांतली परी ?
आणून ठेविलें कशास मजला घरीं ?
हजारांतली एक हरवतां उणें न कांहीं परी
पोंचवा मज माहेरा तरी.

लंकेची पार्वती तुम्हांला दिसते गौरी परी
कशाला राहूं येथें तरी
एकटी न जाइन निघुन परी येथुन,
काव्याचें घेइन बाड सर्व बांधुन,
जाईल कैफ मग तुमचा तो उतरुन"
"नको चालवूं जहाल इतकें अस्त्र सखे मजवरी !
सजवितों म्हणशिल तैशापरी."

२९-९-१९३६

REFBK-0005772
REFBK-0005772

# 'वसंता'चा "बहर"

नादमधुर शब्दयोजना, ठाकठिकींची भाषा, आणि सुबोध रचना हे श्री. वैद्य यांच्या कवितेचे विशेष आहेत. आजकाल प्रसिद्ध होत असलेले काव्यसंग्रह दृष्टीसमोर आणतां या काव्यसंग्रहाचें स्थान बरेंच वरच्या दर्जाचें ठरेल यांत शंका नाहीं. —मौज

वसंत कवीच्या भावी काव्यप्रतिभाविलासाचे आणि सार्थ शब्दयोजनायुक्त काव्याचें पुरःफल या नात्यानें हा 'बहर' सध्यांच्या अनेक काव्यसंग्रहांत उल्लेखनीय असाच ठरल्यावांचून राहणार नाहीं. —ज्ञानप्रकाश

भाषा सुंदर, शब्द समर्पक आणि कल्पना हृदयंगम अशा त्रिवेणी संगमानें श्री. वसंतराव वैद्य यांचें काव्य मराठी आधुनिक कवितेचा रसपरिपोष करतें. —विहार

सौंदर्योपासना, प्रणय, ध्येयनिष्ठता या तीन ठळक विषयांभोंवती त्यांचें बहुतेक काव्य गुंफलेलें आहे. —सकाळ

प्रेमी भावनांचें खोंचदार शब्दांनीं आणि अर्थपूर्ण परंतु संयमी पद्धतीनें ह्या कवितांतून सुंदर दिग्दर्शन झालें आहे. —कला

नव्या आणि जुन्या जमान्याचा सुवर्णमध्य साधून रा. वैद्य यांनीं आपल्या कल्पलतेवर विविधरंगी फुलें फुलविलीं असून त्यांत त्यांचें भाषेवरील प्रभुत्व व कल्पनाविलास चांगल्या प्रकारें दिग्दर्शित झाला आहे.

—विविधवृत्त

या बहरांत खरोखरच वसंताचें सौंदर्य आणि उत्कंठा हीं दोन्ही एकवटलीं आहेत. श्री. वैद्य यांची भाषा आणि सजावट ही जितकी लालित्यपूर्ण आहे, त्याहीपेक्षा त्यांच्या कवितेतील कल्पनाविलास अधिक मनोरम आहे. —महाराष्ट्र, नागपूर.

क्र. ५८६७२